| Article Date | Headline / Summary | Publication |
|---|---|---|
| 22 Feb 2026 | How to be protected through cyber insurance | Prabhat |



# सायबर इन्श्युरन्सद्वारे कसे होईल संरक्षण

डिजिटल पेमेंट हे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. स्थानिक दुकानात UPI कोडचे स्कॅनिंग, ऑनलाइन खरेदीचे बिल भरणे किंवा अॅप वर खरेदी आता काही सेकंदांत पूर्ण होते. ज्याप्रमाणे डिजिटल ट्रान्झॅक्शनची संख्या वाढते आहे. त्याप्रमाणे सायबर जोखीमही तितकीच वाढते आहे. आजकाल फसवणूक करणाऱ्यांनी स्मार्ट, वेगवान आणि विश्वासार्ह भासणाऱ्या पद्धतींचा अवलंब सुरू केला आहे. बनावट शॉपिंग वेबसाइट्स, बँक अलर्ट सारखे भासविणारे फिशिंग लिंक्स आणि क्लोन केलेले पेमेंट पेज यांचा वापर सर्रास केला जातो आहे. अशावेळी नुकसान टाळण्यासाठी सायबर इन्श्युरन्स आर्थिक सुरक्षिततेचे कवच म्हणून महत्त्वाची भूमिका निभावते.

वर्ष २०२६ मध्ये सायबर इन्श्युरन्स हे केवळ मोठ्या संस्थांसाठी असलेले विशिष्ट किंवा तांत्रिक उत्पादन राहिलेले नाही. व्यक्ती आणि कुटुंबे डिजिटल प्लॅटफॉर्म कसे वापरतात यावर आधारित त्याची निर्मिती करण्यात आली आहे. एखाद्या व्यक्तीने नकळत बनावट वेबसाइटवर कार्ड तपशील टाकले, फसव्या पेमेंट लिंकवर क्लिक केले किंवा फिशिंगचा बळी ठरून अनधिकृत आर्थिक ट्रान्झॅक्शन झाले तर पॉलिसीच्या अटी व शर्ती आणि निवडलेल्या कव्हरेजच्या अधीन राहून सायबर इन्श्युरन्स नुकसान भरून काढण्यास मदत करू शकतो.

**पॉलिसीमध्ये काय कव्हर केले जाते?**

इन्श्युरर नुसार कव्हरेज भिन्न असू शकते. मात्र, वैयक्तिक सायबर इन्श्युरन्स पॉलिसी सामान्यतः फिशिंग हल्ले, ओळख चोरी (आयडेंटिटी थेफ्ट), अनधिकृत इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर, ऑनलाईन शॉपिंग फसवणूक आणि कार्ड किंवा UPI अकाउंटचा अनधिकृत वापर यामुळे झालेल्या नुकसानीपासून संरक्षण देतात. काही पॉलिसी सायबर खंडणी घटना यांना देखील कव्हरेज देऊ शकतात. जिथे फसवणूक करणारे डिजिटल डाटा किंवा सिस्टीमचा अॅक्सेस मिळवल्यानंतर पैशांची मागणी करतात.

आर्थिक प्रतिपूर्ती व्यतिरिक्त, काही पॉलिसी मूल्यवर्धित सपोर्ट सेवा देखील देतात. यामध्ये सायबर घटनेदरम्यान सहाय्य, कायदेशीर मार्गदर्शन आणि काही प्रकरणांमध्ये सायबर फसवणुकीनंतर तणावाचा सामना करणाऱ्या पीडितांसाठी प्राथमिक समुपदेशन यासारख्या मदतीचा समावेश असू शकतो. यामागील उद्देश केवळ पैशांच्या प्रतिपूर्तीचा नाही. तर संपूर्ण घटनेदरम्यान वैयक्तिक सहाय्य प्रदान करणे हा आहे.

**पॉलिसीमधून काय वगळले जाते?**

सायबर इन्श्युरन्स जाणीवपूर्वक किंवा गंभीर निष्काळजीपणामुळे झालेले नुकसान कव्हर करत नाही. उदाहरणार्थ, अज्ञात व्यक्तींशी OTP किंवा PIN शेअर करणे, बँक किंवा पेमेंट प्लॅटफॉर्मकडून स्पष्ट सूचना मिळूनही पैसे ट्रान्सफर करणे किंवा संशयास्पद/अप्रमाणित वेबसाइट्सवर ट्रान्झॅक्शन करणे यामुळे क्लेम नाकारला जाऊ शकतो. जाणीवपूर्वक फसवणुकीत सहभाग घेणे किंवा सिक्युरिटीच्या सूचनांकडे वारंवार दुर्लक्ष करणे यामुळे झालेले नुकसान वगळले जाते.

**प्रीमियम खर्च किती असतो?**

सायबर इन्श्युरन्स सामान्यतः मॉड्युलर स्वरूपाचा असतो आणि प्रीमियम हा इन्श्युरन्स रक्कम, कव्हरेज व्याप्ती आणि निवडलेल्या अॅड-ऑन्स यावर अवलंबून असतो. वैयक्तिक सायबर इन्श्युरन्स पॉलिसीसाठी इन्श्युरन्स रक्कम १०,००० पासून सुरू होऊन १ कोटी किंवा त्याहून अधिक पर्यंत जाऊ शकते. प्रीमियम तुलनेने किफायतशीर असते. बेसिक कव्हरेजची सुरुवात वार्षिक शंभर रुपयांपासून होते. अचूक किंमत इन्श्युअर आणि कव्हरेज संरचनेनुसार बदलू शकते.

**पॉलिसी कशी खरेदी करता येते?**

सायबर इन्श्युरन्स पॉलिसी खरेदी करणे सोपे आहे आणि ती बहुतेक वेळा इन्श्युरन्सच्या वेबसाइट्स, मोबाइल अॅप किंवा अधिकृत मध्यस्थांद्वारे ऑनलाइन उपलब्ध असते. प्रक्रियेमध्ये सामान्यतः इन्श्युरन्स रक्कम निवडणे, संबंधित कव्हरेज पर्याय निवडणे आणि सोपा प्रपोजल फॉर्म भरणे यांचा समावेश असतो. डिजिटल वापरानुसार सायबर रिस्क बदलू शकतात. त्यामुळे खरेदीदारांनी खरेदी करण्यापूर्वी पॉलिसी मजकूर काळजीपूर्वक रिव्ह्यू करणे आवश्यक आहे.

**सायबर इन्श्युरन्स खरेदी करण्याचा विचार कोणी करावा?**

कोणतीही व्यक्ती जी नियमितपणे डिजिटल पेमेंट्सचा वापर करते. त्यानी सायबर इन्श्युरन्सचा विचार करणे आवश्यक आहे. यामध्ये UPI, ऑनलाइन बँकिंग, कार्ड, शॉपिंग अॅप किंवा डिजिटल वॉलेटवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असलेल्या व्यक्तींचा समावेश होतो. ज्येष्ठ नागरिक, प्रथमच डिजिटल सेवा वापरणारे यूजर आणि एकाधिक ऑनलाईन अकाउंट मॅनेज करणाऱ्या कुटुंबांना या अतिरिक्त संरक्षणाचा विशेष फायदा होऊ शकतो.

सायबर फसवणूक झाल्यास सर्वप्रथम संबंधित बँक किंवा कार्ड जारीकर्त्याला त्वरित कळवून संबंधित अकाउंट किंवा इन्स्ट्रुमेंट ब्लॉक करणे आवश्यक आहे. त्यानंतर सायबर क्राईम सेल किंवा स्थानिक पोलिसांकडे तक्रार नोंद करणे आवश्यक आहे. इन्श्युरन्सला सामान्यतः घटनेची तक्रार एका निश्चित वेळेत, बहुदा कळाल्यानंतर २४ तासांच्या आत बँक स्टेटमेंट आणि ट्रान्झॅक्शन तपशील यासारख्या सहाय्यक कागदपत्रांसह नोंदविण्याची आवश्यकता असते. त्वरित कृती क्लेमच्या परिणामांमध्ये लक्षणीय फरक करू शकते.

वर्ष २०२६ मध्ये डिजिटल ट्रान्झॅक्शन झपाट्याने वाढत असताना, सायबर इन्श्युरन्स हा आर्थिक नियोजनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. जागरूकता, सावध ऑनलाइन वर्तन आणि जलद प्रतिसाद यांच्यासह याचा समावेश झाल्यास हे डिजिटल पेमेंट्स अधिक सुरक्षित बनवण्यात आणि वाढत्या डिजिटल आर्थिक पर्यावरणात यूजरचा आत्मविश्वास वाढवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.


**– अमरनाथ सक्सेना,**
चीफ टेक्निकल ऑफिसर- कमर्शियल,
बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेड